शिवाजी विद्यापीठ, तक्रार निवारण समिती, कोल्हापूर.

# तक्रार निवारण समिती, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

तक्रार अर्ज क्रं.२३/२०२३

| | |
|---|---|
| श्री.प्रविण गणपत जाधव<br>मु.पो.उंब्रज, भवानीपेठ, ता.कराड,<br>जि.सातारा ४१५१०९ | तक्रारदार |

विरूध्द्

| | |
|---|---|
| १. रयत शिक्षण संस्था, सातारा<br>पोवई नाका, सातारा.<br><br>२. सौ.मंगलताई रा.जगताप महिला महाविद्यालय,उंब्रज,<br>ता.कराड, जि. सातारा. | वि. प |

रयत शिक्षण संस्था, सातारा या शिक्षण संस्थेचे सौ.मंगलताई रामचंद्र जगताप महिला महाविद्यालय, उंब्रज, ता.कराड, जि.सातारा येथील प्रा.प्रविण गणपत जाधव यांनी दि.०४/०५/२०२३ रोजी तक्रार निवारण समितीकडे तक्रार अर्ज दाखल केला आहे. अर्जात नमूद तक्रार पुढीलप्रमाणे.

**तक्रारीचे स्वरूप :**

मी, रयत शिक्षण संस्थेच्या इस्माईल साहेब मुल्ला लॉ कॉलेज, सातारा येथे दि.२६/१२/१९९५ मध्ये अर्धवेळ ८ तासिका तत्वावर कार्यरत होतो. त्यानंतर संस्थेने खालील विविध महाविद्यालयात नेमणूका केल्या. १.महिला महाविद्यालय, उब्रंज २.यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, पाचवड ३. सावित्रीबाई फुले महिला महाविद्यालय, सातारा ४. चंद्राबाई शांताप्पा शेंडुरे कॉलेज, हुपरी ५. सावित्रीबाई फुले महिला महाविद्यालय, सातारा ६. सौ. मंगलताई रा. जगताप महिला महाविद्यालय, उंब्रज. शेवटी माझी बदली उंब्रज महाविद्यालयात झाली असून बदली दिनांकापासून आजअखेर या महाविद्यालयामध्ये सी.एच.बी ९ तासीकांवर कार्यरत आहे.

मी, यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, पाचवड येथे कार्यरत असताना दि.२२ ऑक्टोंबर २००७ जा. क्र.शिसम/उशि/को वि/४९२९ या पत्रानुसार स्थानिक निवड समितीमार्फत निवड करण्यात आलेल्या अधिव्याख्यात्यांच्या सेवा तदूर्थ समजण्यासाठी माहिती पाठविणेबाबत मा. शिक्षण संचालक उच्च

शिवाजी विद्यापीठ तक्रार निवारण समिती कोल्हापूर.

शिक्षण, म. रा. पुणे यांचे पत्र क्र. अमावि - २००७/को वि/जनरल/३२२०१ म वि २ दि २४/९/२००७ या पत्रान्वये दि.१९/९/१९९१ ते ११/१२/१९९९ या कालावधीत स्थानिक निवड समितीमार्फत नेमणुका झालेल्या आहेत व दि.२०/१०/२००७ पर्यंत कार्यरत आहेत अशा अधिव्याख्यात्यांची माहिती सादर करावी. मी, या पत्रात नमुद केल्याप्रमाणे स्वतंत्रपणे ५ प्रतित कॉलेजने फाईल तयार करून त्या पत्रामध्ये नमुद केलेल्या माहिती प्रमाणे सर्व पुरावे/कागदपत्राच्या सत्य प्रति सादर केल्या.

जा. क्रः शिसम/उशी/को वि २२२२ दि.२८ एप्रिल २००८ च्या पत्रान्वये ज्या महाविद्यालयात कार्यरत असलेल्या ज्या अधिव्याख्यात्यांचे प्रस्ताव विभागीय सहसंचालक, (उ.शि) कोल्हापूर विभाग, कोल्हापूर या कार्यालयात सादर केले आहेत अशा अधिव्याख्यात्यांनाच शैक्षणिक वर्षे २००८-०९ सुरू होताना आपल्या महाविद्यालयात पुनश्चः नियुक्ती देण्याबाबत योग्य कार्यवाही करावी.

त्यानंतर मी, सन २००७-२०१६ पर्यंत यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, पाचवड येथे कार्यरत होतो. जा. क्र. २२२/०९-१० दि १८/०९/२००९ मा. संचालक, महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांना १९९१ ते १९९९ या कालावधित स्थानिक निवड समितीमार्फत निवड करण्यात आलेल्या अधिव्याख्यात्यांची सेवा तदूर्थ समजण्याबाबत विद्यापीठाने मागीतलेल्या हमीपत्रानुसार सेवकांची माहिती आवश्यक कागदपत्रासह दोन प्रतित समक्ष पाठवून दिल्या.

जा क्र : संलग्नता/टे १/युजीके No. ६९६९ दि ३० ऑक्टोंबर २०१२ च्या पत्रानुसार सन १९९१ ते १९९९ या कालावधीमध्ये स्थानिक निवड समितीमार्फत नियुक्त केलेल्या अधिव्याख्यात्यांच्या सेवा पुढे चालू ठेवण्याबाबत आपल्या संस्थेतील प्रा.जाधव प्रविण गणपत (समाजशास्त्र) यांच्या सेवा पुढे चालू ठेवण्यासाठीचा प्रस्ताव सादर समितीपुढे करावयाचा आहे. त्यानुसार विद्यापीठास प्रस्ताव सादर केला. त्यावेळी प्राचार्य भोसले विनायक वामन (समाजशास्त्र) हे दि.३१/०५/२०१३ रोजी सेवानिवृत्त झाले असल्याने समाजशास्त्र विषयाची जागा रिक्त होती. ते प्राचार्य S.C Category चे होते. मी देखील त्याच S.C Category होतो. त्यावेळी माझे समायोजन करण्यास काही हरकत नव्हते.

माझी सेवा शासन निर्णय दि.१८ ऑक्टोंबर २००१ नुसार तसेच दि.२६ जून २००९ च्या शासन पत्रातील तरतुदीनुसार माझी सेवा सलगपणे आजअखेर पर्यंत सुरू ठेवलेली आहे. संस्थेमध्ये पूर्णवेळचे पद निर्माण झाल्यास ते मलाच देण्याबाबतची लेखी हमीपत्र जा क्र संलग्नता/टे १/युजीके No ४७७८ दि १९ ऑगस्ट २०१३ च्या पत्रानुसार शासनाला व विद्यापीठाला दिलेले आहे.

शिवाजी विद्यापीठ, तक्रार निवारण समिती कोल्हापूर.

जावक नं. १८३१७ दि.१०/१२/२००९ च्या पत्रानुसार संस्थेने मा. कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांना जागेसंबंधी प्राध्यापकांची नावे व जागा शिल्लक बाबतचे पत्र पाठविण्यात आले होते. परंतु २००९ ला 'समाजशास्त्र' विषयाची जागा उपलब्ध नव्हती त्यामुळे मला मान्यता देता आली नाही. परंतु विद्यापीठ, शासनाच्या समितीने त्यावेळी सर्व कागदपत्रे व मान्यता पडताळून सेवाजेष्ठतेनुसार जागा उपलब्ध झाल्यानंतर प्राधान्याने समाविष्ठ करण्यात यावे अशी शिफारस केली. परंतु २०१३ पासून जागा उपलब्ध असताना देखील माझे समायोजन करण्यात आले नाही.

रयत शिक्षण संस्थेच्या ७ (सात) प्राध्यापकांना २०१० साली विद्यापीठाची मान्यता आल्यानंतर त्यांना पूर्णवेळ नियुक्ती पत्रे देण्यात आली. हे सर्वजण प्राध्यापक वेगवेगळया महाविद्यालयात कार्यरत आहेत. त्यांना Full-time order देताना कोणतीच अडचण आली नाही. परंतु वरील सात प्राध्यापकाजवळ जी कागदपत्रे आहेत ती सर्व कागदपत्रे माझ्याजवळ आहेत हे मी वरचेवर जावून संस्थेला लेखी व तोंडी सांगत होतो.

शिवाजी विद्यापीठ दि.३ जुलै २०२१ जा.क्र.शिवाजी विद्यापीठ/संलग्नता टी १ विभाग प्रशांत/५७० च्या पत्रानुसार सेवा सातत्य पुढे चालू ठेवण्यास मान्यता देत आहे. (शासन पत्रात नमुद केलेल्या अटी व शर्तीच्या अधिन राहून)

त्यानंतर Ref No. AFF.T.3/SDG/67/107 दि.१९ जुलै २०२२ No.००४६५ च्या पत्रानुसार Approwal for the Changes-in-staff and change of Designation of the teacher आणि आडवी मान्यता आली आहे. वर नमुद केलेल्या शिवाजी विद्यापीठाची मान्यता व शासनाची मान्यता (उभी मान्यता) Changes-in-staff (आडवी मान्यता ) हे सर्व कागदपत्रे असताना देखील संस्था पूर्ण वेळ मान्यता (नियुक्ती पत्र) देत नाही व दुर्लक्षीत करत आहे.

मला विद्यापीठाची २ वर्षे मान्यता येवून देखील मला पूर्णवेळ नियुक्तीपत्र देण्यात आले नाही. त्यामुळे मला आर्थिक व मानसिक त्रास सहन करावा लागत आहे. माझे वडिल Cancer ने वारले आहेत आईला Paralysis झाला आहे. ती अंथरूणातच झोपून असते. मला दोन मुले आहेत, ती शाळा शिकत आहेत. त्यांना पैसा कोठून आणणार. त्याचप्रमाणे विधवा बहिनीची २ मुले असे आठ जनांचे कुटुंब आहे. मी कॉलेज सुटल्यानंतर मोलमजुरी करून चरितार्थ चालवित आहे. त्यामुळे माझी आर्थिक व मानसिक शोषण थांबवावे. २ वर्षे मला कॉलेजकडून १ रूपया देखील मिळाला नाही. मी दोन वर्षे बिनपगारी काम करीत आहे. याला सर्वस्वी संस्था व संबंधित क्लार्क जबाबदार आहेत.

शिवाजी विद्यापीठ, तक्रार निवारण समिती, कोल्हापूर.

दि. २६ जानेवारी २०२१ ला उच्च व तंत्रशिक्षण मंत्रालय आपले दारी या उपक्रमांतर्गत मा. ना. श्री. उदय सामंत मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य यांचेकडे निवेदन दिले होते. याबाबत पुढील कार्यवाही आपले स्तरावरून करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल एक महिन्याच्या आत संबंधितास कळवावा तसेच त्याचा अहवाल मा. मंत्री महोदयांच्या कार्यालयास कळवावा अशी शिफारस केली होती. त्यानंतर मी, कुलसचिव, संलग्नता विभाग, शिवाजी विद्यापीठ यांना अर्ज केला. रयत शिक्षण संस्थेने संबंधीत विषयांच्या (समाजशास्त्र) जागा रिक्त झालेस प्रविण गणपत जाधव यांना सेवेत सामावून घेतो. अशी संस्थेने संबंधीत शिक्षकांना हमीपत्र देऊन देखील रिक्त पदे विद्यापीठास कळविले नाही. रिक्तपदाबाबत माहिती मागून घ्यावी असा विनंती अर्ज दिला. त्यानंतर विद्यापीठातील संबधीत विभागाने पत्र पाठवून रिक्त जागेची माहिती घेतली. विद्यापीठाने संस्थेला पत्र पाठविल्यानंतर जावक नं हशव/१/९३२६ दि.०३/०३/२०२१ ला १६ पदे मंजुर आहेत. त्यापैकी १० कार्यरत आहेत व ६ पदे रिक्त आहेत अशी माहिती सादर केली.

त्यानुसार संस्थेत सध्या खालील महाविद्यालयात मी शिकवत असलेल्या समाजशास्त्र विषयाची पूर्ण वेळ पदे रिक्त आहेत १. चंद्राबाई शांताप्पा शेंडुरे कॉलेज, हुपरी २. राजर्षी शाहू कॉलेज, कोल्हापूर ३. सद्गुरू गाडगे महाराज कॉलेज, कराड ४. सौ. मंगलताई रा. जगताप महिला महाविद्यालय, उंब्रज ५. सावित्रीबाई फुले महिला महाविद्यालय, सातारा ६. शिवाजी कॉलेज, सातारा ७. यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, पाचवड

अशा विविध महाविद्यालयामध्ये एकूण ९ जागा उपलब्ध आहेत. ३० जून २०२३ रोजी दोन प्राध्यापक (समाजशात्र) सेवानिवृत्त होत आहेत. ते देखील SC Category चे आहेत. अशा एकुण ११ जागा संस्थेमध्ये उपलब्ध आहेत. या रिक्त पदांपैकी एका पदावर माझे समायोजन व्हावे.

मी, रयत शिक्षण संस्थेच्या विविध महाविद्यालयामध्ये २१ वर्षे अध्यापनाचे काम करीत आहे. सन २०१४ पासून समाजशास्त्र विषयाची जागा भरण्यात आली. मला संस्थेने दिलेल्या हमीपत्राच्या तरतुदीनुसार माझे समायोजन करणे अपेक्षीत होते. पण तसे करण्यात आले नाही.

मी, वारंवार लेखी व तोंडी संस्था ऑफीस, सहसंचालक, कोल्हापूर यांना विनंती केली. मात्र माझ्या विनंतीचा कोणीही विचार केला नाही. मी एक मागासवर्गीय समाजातील आहे. त्यामुळे आपणाकडून मला न्याय मिळावा ही नम्र विनंती.

माझ्यावर संस्थेने समाजशास्त्र विषयांच्या जागा शिल्लक असताना देखील अन्याय केला आहे. त्यामुळे माझे आर्थिक व मानसिक छळ थांबवावा. मला नाइलाजाने तक्रार करावी लागत आहे.

सबब माझी विनंती की, रयत शिक्षण संस्थेच्या वर नमुद केलेल्या महाविद्यालयातील 'समाजशास्त्र' विषयांच्या रिक्तपदावर माझे समायोजन करण्याबाबत आणि मला पूर्णवेळ सेवेचे सर्व लाभ देण्याबाबत संबंधीत संस्थेस आदेश दयावे ही नम्र विनंती.

**महाविद्यालयाचा अभिप्राय :**

१. मा. संचालक महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांचेकडील जा. क्र. संलग्नता/टे१/एमएके/६९९७ ता. ११/९/२००९ व जा. क्रं. संलग्नता/टे१/युजीके/६९६९ ता. ३०/१०/२००९ ची प्राचार्य, यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, पाचवड यांना विद्यापीठाने पाठविलेल्या पत्राने सन १९९१-१९९९ मध्ये स्थानिक निवड समिती मार्फत नियुक्त केलेल्या अधिव्याख्यात्यांच्या सेवा पुढे चालु ठेवण्यासाठी विद्यापीठामार्फत मा. शिक्षण सहसंचालक (उ.शि.), कोल्हापूर विभाग, कोल्हापूर यांच्या अध्यक्षतेखाली गठीत केलेल्या समितीपुढे सबंधित महाविद्यालयांनी विद्यापीठाकडे प्रस्ताव सादर केलेले होते.

२. तद्नंतर मा. संचालक महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांचेकडील जा. क्र. संलग्नता/टे १/एमएके/८७६६ ता.०३/११/२००९ च्या पत्राने रोस्टर बाबतची माहिती मागविलेली होती.

३. संस्थेने जा.क्र. उ. शि./१८३१७ दि १०/१२/२००९ च्या पत्राने रोस्टर बाबतची माहिती विद्यपीठकडे सादर केलेली होती त्यामध्ये समाजशास्त्र विषयासाठी अनुशेष शिल्लक नसलेबाबत कळविलेले आहे.

४. तद्नंतर संस्थेने जा.क्र. उ. शि./१८७७५ दि.१२/०२/२०१३ च्या पत्राने संस्थेच्या यशवंतराव चव्हाण महाविद्यालय पाचवड यांना संस्थेत भविष्यात त्यांच्या विषयाच्या जागा निर्माण झाल्यास अनुशेषानुसार त्यांना सेवेत सामावून घेणेत येईल असे विद्यापीठाला पत्र दिलेले होते.

५. तद्नंतर संस्थेने श्री. जाधव यांच्या विनंतीनुसार जा. क्र. उ. शि./९३२५ दि.०३/०३/२०२१ ने मा. शिक्षण सहसंचालक यांना दि. १०/७/२०२१ रोजी सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय मुंबई यांनी तपासलेल्या रोस्टरची प्रत सादर करून ६ पदे रिक्त असलेबाबत कळविलेले आहे.

शिवाजी विद्यापीठ, तक्रार निवारण समिती कोल्हापूर.

६. त्यानुसार मा.उपकुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांनी जा.क्र. संलग्नता टी १ विभाग/प्रशांत/५७०/०००४६ दि.०३/०७/२०२१ च्या पत्राने श्री. प्रविण जाधव यांना सेवा पुढे चालू ठेवण्यास मान्यता दिलेली आहे.

७. वरील बाबीस अनुसरून संस्थेने मा. शिक्षण सहसंचालक (उ. शि.), कोल्हापूर विभाग, कोल्हापूर यांना जा. क्र. हशव/२३४० दि १३/७/२०२१ च्या पत्राने त्यांची मान्यता मिळणेबाबत विनंती केलेली आहे.

८. पुनश्चः संस्थेने मा.शिक्षण सहसंचालक, (उ.शि.) कोल्हापूर विभाग, कोल्हापूर यांना जा.क्र. हशव/१६०७६ दि.१०/१२/२०२२ ने श्री. जाधव यांना मान्यता द्यावी म्हणजे श्री. जाधव यांना नियुक्ती देणे बाबतची पुढील कार्यवाही करणे सोईचे होईल असे कळविलेले आहे.

९. पुनश्चः संस्थेने मा. शिक्षण सहसंचालक, (उ.शि) कोल्हापूर विभाग, कोल्हापूर यांना जा.क्र. हशव/१/२०३१ दि.०८/०२/२०२३ ने श्री. जाधव यांना मान्यता द्यावी म्हणजे श्री. जाधव यांना नियुक्ती देणे बाबतची पुढील कार्यवाही करणे सोईचे होईल. असे कळविलेले आहे.

१०. त्यावर मा. शिक्षण सहसंचालक (उ.शि.), कोल्हापूर विभाग, कोल्हापूर यांनी जा.क्र. विसस/उशि/कोवि/अनि २/२०२३/२५४१ दि.०९/०६/२०२३ च्या पत्राने श्री.जाधव यांचेबाबतची विविध प्रकारची माहिती मागविलेली आहे.

सदरची माहिती मा. शिक्षण सहसंचालक (उ.शि.), कोल्हापूर विभाग, कोल्हापूर यांचेकडे सादर केलेली आहे. संबधित विभागाने मान्यता देताच त्यानुसार पुढील कार्यवाही करीत आहोत.

**संस्थेचा अभिप्राय :**

विद्यापीठाने श्री. जाधव यांना स्थानिक निवड समितीमार्फत निवड करण्यात आलेल्या अधिव्याख्यात्यांच्या सेवा तदर्थ समजण्याबाबत मान्यता दिलेली आहे. या मान्यतेस अनुसरून मा. शिक्षण सहसंचालक, (उ.शि.) कोल्हापूर विभाग, कोल्हापूर यांची मान्यता घेणेसाठी संस्थेचा पत्रव्यवहार सुरू आहे. सोबत कागदपत्रे जोडली आहेत. संस्थेने श्री. जाधव यांना सद्या तात्पुरत्या पध्दतीने तासिका तत्वावर नेमणूक दिलेली आहे. मा. शिक्षण सहसंचालक (उ.शि.) कोल्हापूर विभाग, कोल्हापूर यांनी श्री. जाधव यांना मान्यता दिल्यानंतर तदर्थ नियुक्ती आदेश देण्यास संस्थेची काहीही हरकत नाही.

शिवाजी विद्यापीठ, तक्रार निवारण समिती, कोल्हापूर.

**समितीची निरीक्षणे:-**

उपरोक्त प्रकरणी तक्रारदार यांनी संस्थेच्या विविध महाविद्यालयात आपण सन १९९५ पासून सी. एच.बी तासिकावर कार्यरत असल्याचे कथन करून संस्थेकडे सध्या या विषयाच्या काही जागा रिक्त आहेत. त्यानुसार आपले पूर्णवेळ समायोजन करण्याची तक्रार समितीसमोर मांडली आहे. या प्रकरणी तक्रारदार, संस्था प्रतिनिधी, प्राचार्य यांचे युक्तीवाद समितीकडून ऐकण्यात आले. या प्रकरणी समितीने विद्यापीठाच्या संलग्नता टी १ विभागाकडूनही माहिती घेतली असता, समितीसमोर संलग्नता टी १ विभागाकडून सादर करण्यात आलेल्या कागदपत्रांमध्ये सन १९९१ ते १९९९ या कालावधीमध्ये स्थानिक निवड समितीमार्फेत नियुक्त अधिव्याख्यात्यांची सेवा पुढे चालू ठेवण्यासाठी विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या ठरावानुसार डॉ.बी.एन.गोफणे यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत केली होती. समितीच्या कार्यकक्षा निश्चित केल्यानंतर दि.१०/०५/२०१३ रोजी समितीच्या बैठकीपुढे एकूण ४ शिक्षकांच्या प्रस्तावांची छाननी करण्यात आली. श्री.जाधव यांच्या प्रस्तावावर पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्याबाबत समितीने शिफारस केली. 'दिनांक २६/०६/२००९ शासन निर्णयावेळी सेवत कार्यरत असल्याने तसेच भविष्यात समाजशास्त्र विषयाचे पद रिक्त झाल्यानंतर अनुशेषानुसार त्यांना सेवेत सामावून घेण्याबाबत संबधित संस्थेने दि.१२/०२/२०१३ चे हमीपत्र दिले आहे. सबब दि. २६/६/२००९ च्या शासन पत्रातील निकषानुसार व संस्थेच्या हमीपत्रानुसार त्यांची सेवा पुढे चालू ठेवण्याची समिती शिफारस करित आहे'.

उपरोक्त बाबी अवलोकनी घेवून सुनावणी दरम्यान उभयपक्षी आपसी सामंजस्यांने काही मार्ग निघतो का या दृष्टीने प्रयत्न केले असता, संस्था आणि महाविद्यालय तर्फे संस्थेचे प्रतिनीधी व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय माधवराव कांबळे यांनी समितीपुढे असे निवेदन दिले आहे की, या समितीकडून जर आदेश देण्यात आला तर संस्थेतर्फे विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेने गठीत केलेल्या समितीसमोर दि.१२.०२.२०१३ रोजी देण्यात आलेल्या हमीपत्रानुसार संस्थेकडे संबधित विषयाच्या आज रोजी उपलब्ध असलेल्या पूर्णवेळ पदाच्या अनुशेषानुसार तक्रारदाराची सेवा समायोजित करु शकतील. तथापि त्या सेवा मा. सहसंचालक, (उ.शि.) कोल्हापूर विभाग, कोल्हापूर यांच्या मान्यता मिळणेच्या अधीन राहून करण्यात येईल. संस्था व प्राचार्याचा हा प्रस्ताव तक्रारदारांना मान्य आहे. या अर्थी उभयपक्षी हा प्रस्ताव मान्य करण्यात आलेला होता त्या अर्थी या प्रस्तावानुसार प्रस्तुतची तक्रार ही निकालात काढण्यास हरकत नाही असे या समितीचे मत आहे. सबब, खालील आदेश पारित करण्यात येत आहेत.

शिवाजी विद्यापीठ, तक्रार निवारण समिती कोल्हापूर.

## आदेश

प्रस्तुतची तक्रार मंजूर करण्यात येत आहे.

जाबदारांनी आज रोजी संस्थेकडे उपलब्ध असलेल्या पूर्णवेळ पदाच्या रिक्त अनुशेषामधून तक्रारदाराची सेवा पूर्णवेळ सेवा म्हणून मा.सहसंचालक, (उ.शि.) कोल्हापूर विभाग, कोल्हापूर यांच्या मान्यतेच्या अधीन राहून समायोजित करण्याची कार्यवाही करावी. तसेच त्या अनुषंगीक लाभ तक्रारदार यांना देण्यात यावेत.

झालेल्या निर्णयाच्या प्रती संबधिताना देऊन तसे कळविणेत यावे.

दिनांक : 2 6 MAR 2024

सदस्य सचिव
(श्रीमती ए.ए.कदम)

सदस्य
(श्रीमती ए.एच.कोलेकर)

सदस्य
(प्रा.डॉ.एस.पी.हंगिरगेकर)

सदस्य
(डॉ.व्ही.एन.शिंदे)

सदस्य
(प्रा.डॉ.एस.एस.महाजन)

सदस्य
(श्री.एस.यु.शिंदे)

अध्यक्ष
(श्री.ए.व्ही.देशपांडे)